दैनिक
# विवेक सिंधु

बीड जिल्हा | रविवार, दि.12 एप्रिल 2026 | viveksindhu@gmail.com | वर्ष 46 वे अंक क्र.11 | पाने 4 | किंमत : 2 रु. | www. viveksindhu.com

### अभ्यासाच्या तणावाने घेतला जीव

## अंबाजोगाई हादरले ! बारावीच्या विद्यार्थिनीची आत्महत्या

अंबाजोगाई – शहरातील सावता माळी चौक परिसरात अत्यंत हृदयद्रावक घटना घडली असून, बारावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या १७ वर्षीय विद्यार्थिनीने अभ्यासाच्या तणावातून गळफास घेऊन आत्महत्या केल्याने संपूर्ण शहरात हळहळ व्यक्त होत आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, पूनम मेघराज दहिफळे (वय १७) ही मूळची धारूर तालुक्यातील उमरेवाडी येथील रहिवासी असून, शिक्षणासाठी अंबाजोगाई येथे वास्तव्यास होती. ती आपल्या लहान भावासह आणि आजीसोबत राहत होती. तिचे वडील नोकरीनिमित्त पुण्यात असल्याची



माहिती समोर आली आहे.

शुक्रवारी (दि. १० एप्रिल) रात्री पूनमने राहत्या घरी सीलिंग फॅनला गळफास घेत जीवन संपवले. शनिवारी सकाळी ही बाब उघडकीस येताच परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई शहर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.
पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी स्वाराती रुग्णालयात पाठवला असून, या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार, परीक्षेचा ताण आणि अभ्यासाचे दडपण यामुळे पूनमने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.
या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून, विद्यार्थ्यांवर वाढत चाललेल्या मानसिक तणावाचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## शालेय बसच्या मनमानीला चाप: सरकारची नवी 'स्मार्ट' नियमावली

### विद्यार्थ्यांची सुरक्षा आणि पालकांच्या खिशाला मिळणार मोठा दिलासा

मुंबई– महाराष्ट्र राज्य सरकारने शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतूक व्यवस्थेतील पारदर्शकता वाढवण्यासाठी 'महाराष्ट्र मोटार वाहन (शालेय बस नियमन) नियम २०२६' अंतर्गत कडक नियमावली जाहीर करण्याची तयारी सुरू केली आहे. राज्याच्या गृह विभागाने या संदर्भातील मसुदा अधिसूचना नुकतीच प्रसिद्ध केली असून परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी जनतेला पुढील १५ दिवसांत यावर हरकती व सूचना नोंदवण्याचे आवाहन केले आहे. शालेय बसमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे, कर्मचाऱ्यांची उत्तरदायित्व निश्चित करणे आणि पालकांची होणारी आर्थिक पिळवणूक थांबवणे हा या नवीन सुधारित नियमांचा मुख्य उद्देश



आहे.

या नवीन नियमांनुसार सर्व शालेय बस आणि व्हॅनमध्ये जीपीएस आधारित 'व्हेईकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाइस' आणि पॅनिक बटण बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी अग्निसुरक्षा यंत्रणा, सीसीटीव्ही कॅमेरे आणि प्रत्येक सीटसाठी सीट बेल्टची सक्ती करण्यात आली असून डिजिटल सेफ्टी मॉनिटरिंग

▸ पान 3 वर

## विश्वनाथ लाटकर यांचे निधन



अंबाजोगाई (प्रतिनिधी) अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना येथील सेवानिवृत्त कर्मचारी व पत्रकार प्रशांत लाटकर यांचे वडील विश्वनाथ आप्पा लाटकर यांचे अल्पशा आजाराने आज सकाळी निधन झाले.
विश्वनाथ आप्पा लाटकर हे मागील काही दिवसांपासून आजारी होते. त्यांचेवर लातुर येथील एका खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले होते. सदरील रुग्णालयात उपचार करून त्यांना सुटी झाल्यानंतर ते अंबाजोगाई येथील आपल्या निवासस्थानी आले होते. मात्र त्यांना परत त्रास होवू लागल्यामुळे येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर उपचार सुरु होते मात्र प्रकृती उपचाराला प्रतिसाद देत नसल्याने आज सकाळी रुग्णालयातच त्यांचे निधन झाले. आज ११ एप्रिल शनिवार रोजी सायंकाळी ५:३० वाजता विश्वनाथ आप्पा यांच्या पार्थिवावर बाराखांबी मंदिराजवळील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आप्तेष्ट, लाटकर परीवाराचे स्नेही व पत्रकार सहभागी होते.

# मैत्रिणीच्या अश्लील ब्लॅकमेलिंगमुळे ‘त्या’ तरुण डॉक्टरची आत्महत्या

### अंबाजोगाईतील धक्कादायक प्रकरणाचा मोबाईल पासवर्डमुळे उलगडा

अंबाजोगाई: येथील स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षण घेत असलेले डॉ. मंदार उमेश दाभाडे (वय २९) यांनी अंबाजोगाईतील चनई रोड भागातील संत रोहिदास नगर येथील भाड्याच्या खोलीत ६ एप्रिल २०२६ रोजी पहाटे गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या घटनेने खळबळ उडाली होती. सुरुवातीला या आत्महत्येचे कारण अस्पष्ट होते, मात्र मरण्यापूर्वी मंदार यांनी आपल्या भावाच्या मोबाईलवर पाठवलेल्या एका पासवर्डमुळे या प्रकरणातील धक्कादायक वास्तव उघड




झाले असून एका महिला सहकाऱ्याच्या जाचाला कंटाळून त्यांनी आत्महत्या केल्याची माहिती समोर आली आहे.
याप्रकरणी मृत डॉक्टरच्या भावाने दिलेल्या तक्रारीनंतर अंबाजोगाई शहर पोलिसांनी संबंधित महिलेवर गुन्हा दाखल केला आहे.
या प्रकरणाचा उलगडा अतिशय

▸ पान 3 वर

## महात्मा फुले यांनी शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली - राजकिशोर मोदी

### लोकविकास महाआघाडीकडून क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन


अंबाजोगाई (प्रतिनिधी) – आधुनिक भारताचे शिल्पकार, थोर समाजसुधारक, सत्यशोधक समाजाचे संस्थापक आणि क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी लोकविकास महाआघाडीकडून त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना लोकविकास महाआघाडीचे प्रमुख नेते राजकिशोर मोदी यांनी महात्मा फुले यांनी शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली, स्त्री शिक्षण, अस्पृश्यता निवारण आणि शेतकरी – कामगारांच्या हक्कांसाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. आपण क्रांतीसूर्य महात्मा यांच्या विचारांची जोपासना करू असे आवाहन मोदी यांनी केले.

▸ पान 3 वर



## खंडणी प्रकरणात रेखा वंजारे यांना अंबाजोगाई न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन मंजूर

अंबाजोगाई: राज्यभरात नावाजलेल्या यश कन्स्ट्रक्शन कंपनीकडे एक कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा आरोप असलेल्या रेखा उत्तम वंजारे यांना अंबाजोगाई जिल्हा व सत्र न्यायालयाने दिलासा दिला असून त्यांचा अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणात रेखा वंजारे यांच्यावर अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०८(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरणाची सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ. रचना तेहरा यांच्या न्यायालयात पार पडली.




आरोपीच्या वतीने अड. नितीन जाधव यांनी मांडलेला प्रभावी आणि समर्पक युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने हा महत्वपूर्ण निर्णय दिला आहे.
या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, अंबाजोगाई तालुक्यातील शेपवाडी येथील रहिवासी असलेल्या रेखा उत्तम वंजारे यांनी यश कन्स्ट्रक्शन कंपनीच्या विरोधात शासकीय कार्यालयात विविध तक्रारी केल्या होत्या. या तक्रारी आणि त्यासंदर्भातील चौकशी मागे घेण्यासाठी त्यांनी कंपनीकडे एक कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी केल्याचा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १०४/२०२६ नुसार गुन्हा नोंदवण्यात आला होता. अटकेची शक्यता निर्माण झाल्याने आरोपी रेखा वंजारे यांनी अंबाजोगाई येथील जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता.

या अर्जावर सुनावणी दरम्यान आरोपीच्या वतीने प्रसिद्ध विधीज्ञ अड. नितीन जाधव यांनी प्रभावी युक्तिवाद केला. त्यांनी मांडलेले कायदेशीर मुद्दे आणि वस्तुस्थिती विचारात घेऊन न्यायालयाने रेखा वंजारे यांना सशर्त अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. या कायदेशीर प्रक्रियेत अड. नितीन जाधव यांना अड. राजकुमार चौरे, गुंडाप्पा बुरकुले आणि बाळासाहेब गायके यांनी सहकार्य केले. या निकालामुळे सदर खंडणी प्रकरणात आरोपीला तात्पुरता दिलासा मिळाला आहे.

## गावठी पिस्टलसह सोमनवाडीचा धाबा चालक जेरबंद

### » स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

अंबाजोगाई: तालुक्यातील बर्दापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेने शुक्रवारी रात्री एक महत्त्वपूर्ण कारवाई केली. सोमनवाडी शिवारातील एका धाबा चालकाकडे बेकायदेशीर गावठी बनावटीचे पिस्टल असल्याची खात्रीलायक माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. १० एप्रिल २०२६ रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास केलेल्या या कारवाईत पोलिसांनी ४० हजार रुपये किमतीचे पिस्टल जप्त केले असून आरोपीला पुढील तपासासाठी बर्दापूर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, मौजे सोमनवाडी शिवारातील धाबा चालक विलास अंकुश चाटे हा स्वतःकडे पिस्टल बाळगत असून तो सध्या धाब्यावरच



हजर आहे. या माहितीची खातरजमा केल्यानंतर पोलीस पथकाने तातडीने धाब्यावर छापा टाकला. यावेळी करण्यात आलेल्या झडतीत विलास चाटे याच्याकडे बेकायदेशीर शस्त्र मिळून आले. याप्रकरणी पोलीस नाईक गोविंद भताने यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध बर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ९७/२०२६ नुसार भारतीय हत्यार कायद्याच्या कलम ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

▸ पान 3 वर

## नेकनूरमध्ये कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या 11 गोवंशांची सुटका; स्थानिक गुन्हे शाखेचा छापा

बीड: नेकनूर परिसरात कत्तलीच्या उद्देशाने अत्यंत क्रूरपणे साठवून ठेवलेल्या ११ गायींची स्थानिक गुन्हे शाखेने सुटका केली असून याप्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांच्या मार्गदर्शनाखाली १० एप्रिल २०२६ रोजी रात्री ही कारवाई करण्यात आली. कळसंबर रोडवरील एका पत्र्याच्या शेडमध्ये या गायींना चारा-पाण्याविना, तोंडे जमिनीला घासतील अशा पद्धतीने आखूड दोरीने बांधून ठेवण्यात आले होते. या कारवाईत पोलिसांनी ३ लाख १५ हजार रुपये किमतीचा गोवंश जप्त केला असून, आरोपी आरबाज जलाल पठाण याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या गोपनीय




माहितीनुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने आणि त्यांचे पथक नेकनूर पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत असताना, त्यांना आरबाज पठाण याने नगर येथील कत्तलखान्यात पाठवण्यासाठी गायी साठवून ठेवल्याची खबर मिळाली. पोलिसांनी तातडीने पंचांसह छापा टाकला असता, तिथे अकरा गायी अत्यंत दाटीवाटीने आणि निर्दयी स्थितीत आढळून आल्या. या मुक्या प्राण्यांना रात्रीच्या वेळी कत्तलखान्याकडे हलवण्याची तयारी सुरू होती, मात्र पोलिसांनी वेळेत पोहोचून हा प्रयत्न हाणून पाडला.

या प्रकरणी आरोपीवर महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम आणि प्राण्यांना छळ प्रतिबंधक कायद्यान्वये नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या सर्व गायींना सुरक्षिततेसाठी बीड येथील कै. तुकाराम गुरुजी गोधाम प्रकल्पात पाठवण्यात आले आहे. ही यशस्वी कामगिरी पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, महेश विघ्ने, महेश जोगदंड, जफर पठाण, दिलीप गित्ते आणि गणेश मराडे यांच्या पथकाने फत्ते केली. या कारवाईमुळे परिसरात अवैध धंदे चालवणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

## संतोष देशमुख हत्या प्रकरण; धनंजय देशमुखांचे दादा खिंडकरच्या दाव्याला बळकटी देणारे विधान, चार महिन्यापूर्वीचे गुपीत फोडले

बीड – मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात एक मोठा दावा समोर आला आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणाची तक्रार मागे घेतली, तरच दादासाहेब खिंडकर यांना कारागृहातून सोडू, असा प्रस्ताव धनंजय देशमुख यांना देण्यात आल्याचा दावा १३ महिन्यांच्या कारावासानंतर बाहेर पडलेले दादासाहेब खिंडकर यांनी केला होता. आता खिंडकर यांच्या दाव्याला धनंजय देशमुख यांनी दुजोरा दिला आहे. संतोष देशमुख केस मागे घेण्यासाठी आपल्याला एका ठिकाणी बोलावण्यात आले होते, असा खुलासा धनंजय देशमुख यांनी केलाय. धनंजय देशमुख यांच्या दाव्यामुळे बीड जिल्ह्यात राजकीय आणि सामाजिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

धनंजय देशमुख, दादासाहेब खिंडकर आणि भाजप आमदार सुरेश धस, यांनी बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांची भेट घेतली. मस्साजोग गावात वाढलेल्या चोऱ्या, घरफोडी आणि इतर सुरक्षेच्या प्रश्नांवर या बैठकीत तासभर चर्चा झाली. या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना धनंजय



देशमुख यांनी गेल्या चार महिन्यांपासून दडलेले हे गुपित उघड करत, त्यांचे साडू दादासाहेब खिंडकर यांनी तुरुंगातून सुटल्यानंतर त्यासंबंधी केलेल्या दाव्याला बळकटी देणारे वक्तव्य केले आहे.

धनंजय देशमुख म्हणाले, डिसेंबर महिन्यात ती घटना घडली होती. संतोष देशमुख प्रकरण मिटवण्यासाठी मला एका जागेवर बोलवून घेतले होते. त्यातील एका साक्षीदाराने बोलावून घेऊन हे प्रकरण मिटवू असे म्हटले होते. मला ज्या ठिकाणी यायचे आहे त्या ठिकाणी मी येईल मात्र ज्या ठिकाणी तुम्ही बोलवाल त्या ठिकाणी येण्यास मी तयार नाही, त्यामुळे तिथे मी गेलो नाही. मी पोलिस अधीक्षकांना देखील याविषयी सांगितले होते. माझी बदनामी, खच्चीकरण कसे होईल यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र मी माझ्या भावाला न्याय मिळवून देण्यासाठी लढत आहे आणि लढत राहीन.

१३ महिन्यांच्या कारावासानंतर बाहेर पडलेले दादासाहेब खिंडकर यांचे गावात जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी बोलताना खिंडकर म्हणाले, आम्हाला ज्या गुन्ह्यात अडकवण्यात आले, त्यातून बाहेर काढण्यासाठी धनंजय देशमुख यांच्यावर दबाव टाकला जात होता. 'जर दादा खिंडकरला बाहेर काढायचे असेल, तर संतोष देशमुख हत्या प्रकरणातील तक्रार मागे घ्या,' अशी अट घालण्यात आली होती. या दाव्यामुळे या हत्याकांडामागील सूत्रधारांकडून आजही तपासावर दबाव आणला जात असल्याची शंका व्यक्त होत आहे. ९ डिसेंबर २०२४ रोजी बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची अपहरण करून अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार म्हणून आमदार धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मीक कराड याचे नाव समोर आले होते.

## जयभीम महोत्सवा निमित्त २० रक्तदात्यांचे रक्तदान आणि रुग्णांना फळ वाटप



केज – केज शहरात दिपकभाऊ युवा मंचच्या वतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त उपजिल्हा रुग्णालयात आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात २० रक्तदात्यांनी रक्तदान केले आणि रिपाइंचे केज तालुकाध्यक्ष दीपक कांबळे व कार्यकर्त्यांनी रुग्णालयातील रुग्णांना फळ वाटप करण्यात आले.

या रक्तदान शिबिराचे अध्यक्षस्थानी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. दत्तात्रय केंद्रे, रिपाइंचे तालुकाध्यक्ष दीपक कांबळे, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. केशव इंगोले, लखन हजारे, माजी नगरसेवक कपिल मस्के, बबलू साखरे, अशोक गायकवाड, शेखर सिरसट, प्रवीण मस्के, सुदेश सिरसट, प्रकाश मस्के, दादासाहेब ससाणे, रक्तपेढीचे प्रमुख श्रीकृष्ण नागरगोजे, रमेश निशिगंध, दिलीप बनसोडे, हरेंद्र तुपारे, रोहीत कांबळे, रंजीत कांबळे, सुरज काळे, राहुल काळे, प्रदिप शिनगारे, शोयब शेख, निसार सय्यद, विनोद गायकवाड, मिटू सरवदे, बाळासाहेब कांबळे, सुशिल कांबळे, किशोर कांबळे, सुमित कांबळे, जयपाल रोकडे, संभाजी हजारे, अनंत काळे, वैभव जाधव, अभिषेक जाधव, शंकर निर्मळ, अबु शेख, संगम कांबळे, शाम गुळवे, भीमा शिनगारे, जमीर शेख यांच्यासह केज तालुका सरचिटणीस गौतम बचुटे आणि रक्तदाते उपस्थित होते.

## केवळ दीडशे रुपयांसाठी तरुणावर वस्तऱ्याने हल्ला


अंबाजोगाई: शहरातील लहुजी चौक परिसरात केवळ पैशांच्या वादातून एका तरुणावर वस्तऱ्याने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना नऊ एप्रिल रोजी उघडकीस आली आहे. आरोपींनी पैशांची मागणी पूर्ण न झाल्याच्या रागातून श्रीकांत गौरी या तरुणाच्या दोन्ही हातांवर वस्तऱ्याने वार करून त्याला गंभीर जखमी केले.

अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दहा एप्रिल रोजी या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी श्रीकांत गौरी यांच्याकडे प्रताप जाधव आणि अजय पवार या आरोपींनी तीनशे रुपयांची मागणी केली होती. मात्र, आपल्याकडे केवळ दीडशे रुपये असल्याचे फिर्यादीने सांगताच आरोपींनी संतापून त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण सुरू केली. याच दरम्यान आरोपी अजय पवार याने आपल्याजवळील वस्तऱ्याने फिर्यादीच्या दोन्ही हातांवर वार करून त्यांना रक्तबंबाळ केले. या घटनेमुळे परिसरात दहशत निर्माण झाली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

## बीडच्या ऋषीकेश लाहोटी यांचे जागतिक स्तरावरील 'सी.एफ.ए' परीक्षेत देदीप्यमान यश

बीड: येथील विजय इंडस्ट्रीजचे संचालक सत्यनारायण लाहोटी यांचे नातू ऋषीकेश विजयकुमार लाहोटी यांनी अमेरिकेतील नामांकित 'सी.एफ.ए. इन्स्टिट्यूट'ची अंतिम परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण केली आहे. गुंतवणूक आणि वित्त क्षेत्रातील जगातील सर्वोच्च मानली जाणारी ही पदवी मिळवणारे ऋषीकेश हे बीड जिल्ह्यातील मोजक्या यशस्वी विद्यार्थ्यांपैकी एक ठरले आहेत. पुण्यात राहून अत्यंत कठीण अशा या परीक्षेची तयारी पूर्ण करत त्यांनी हे जागतिक यश संपादन केले असून त्यांच्या या कामगिरीमुळे संपूर्ण जिल्ह्याची मान अभिमानाने उंचावली आहे.

सी.एफ.ए. इन्स्टिट्यूट ही जागतिक स्तरावरील एक अग्रगण्य संस्था असून ती



गुंतवणूक व्यावसायिकांना उच्च दर्जाचे वित्त शिक्षण प्रदान करते. नैतिक मूल्ये आणि शैक्षणिक उत्कृष्टतेचा वारसा जपत ही संस्था जागतिक वित्त क्षेत्राचे भविष्य घडवण्याचे कार्य करते. ऋषीकेश यांनी मिळवलेली ही पदवी त्यांच्या कठोर परिश्रमाचे फळ असून, भविष्यात या जागतिक दर्जाच्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी आणि भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी करण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे.

लाहोटी परिवार हा केवळ व्यवसायातच नव्हे तर शिक्षणातही अग्रेसर राहिला आहे. ऋषीकेश यांचे आजोबा सत्यनारायण लाहोटी हे मराठवाडा चेंबर्स ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष आहेत, तर त्यांचे मोठे बंधू मधुसूदन लाहोटी हे आर्किटेक्चर क्षेत्रात कार्यरत आहेत. ऋषीकेश यांच्या या यशाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून नुकताच विजय इंडस्ट्रीजच्या वतीने त्यांचा विशेष गौरव करण्यात आला. या सोहळ्याला विजयकुमार लाहोटी, शामसुंदर लाहोटी, चार्टर्ड अकाउंटंट लड्डा, मुंदडा यांच्यासह लाहोटी परिवारातील सदस्य आणि इंडस्ट्रीजचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## मंगळवार पासुन दहीफळ येथील वडमाऊलीदेवीच्या यात्रेचे आयोजन

केज – केज तालुक्यातील दहीफळवडमाऊली येथे ब दर्जा प्राप्तचे तिर्थक्षेत्र असलेल्या वडजुआई (वडमाऊली) देवीचा यात्रा महोत्सव दरवर्षी प्रमाणे यावर्षीही मंगळवार दि.१४ एप्रिल ते १८ एप्रिल शनिवार या दरम्यान होत असलेल्या या यात्रे निमित्त ग्रामीण भागातील रशिक बांधवांच्या मनोरंजानासाठी आराधी गिते व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.भाविक भक्तानी या यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन यात्रेची शोभा वाढवावी अशी विनंती वडमाऊली देवस्थानचे अध्यक्ष येडूनाना ठोंबरे,सचिव भिकचंद ठोंबरे (सावकार), कोषाध्यक्ष हारीमास्तर ठोंबरे, सदस्य गंगाधर गदळे,बन्सी ठोंबरे रामहारी ठोंबरे व इतर सदस्यांसह गावक–यांनी केली आहे.

केज तालुक्यातील दहीफळ वडमाऊलीयेथे ब दर्जा असलेले तिर्थक्षेत्र वडजुआई (वडमाऊली) देवीचे मंदीर आहे. दरवर्षी चैत्र महीन्यातील अष्टमी पासुन या यात्रेला सुरुवात होते. दरवर्षी प्रमाणे यावर्षीही दि.१४ एप्रिल मंगळवारी सकाळीदेवीची पालखी दहीफळ येथून बँड लेझीम पथक व आराधी मंडळीदेवीची गाणे गाऊन पालखी महोत्सवात सहभागी होतात.या वडजुआई (वडमाऊली) देवीला महीला पुरणपोळीचा नैवद दाखवुन सुवासीनी जेवणाचा कार्यक्रम करतात. यात्रेनिमित्त दहीफळवडमाऊलीयेथील माजी पंचायत समीती सदस्य दत्तात्रय (पिंटु)



ठोंबरे,वडमाऊली देवस्थानचे अध्यक्ष येडूनाना ठोंबरे,सचिव भिकचंद ठोंबरे (सावकार),सदस्य हारीमास्तर ठोंबरे,सदस्य गंगाधर गदळे,बन्सी ठोंबरे,रामहारी ठोंबरे सह सर्व सदस्यांनी व गावक–यांनी पुढाकार घेऊन ग्रामीण भागातील जनतेच्या मनोरंजनासाठी १४ एप्रिल मंगळ– वारी संध्याकाळी आठ वाजता सांस्कृतीक कार्यक्रम व देवीमंदीर परिसरात आराधी गितांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.बुधवारी व गुरुवारी संध्याकाळी आराधी गीताचा कार्यक्रम आयोजित केला आहे.


दि.१७ एप्रिल शक्रवारी संध्याकाळी वडमाऊली देवी मंदीर परीसरात देवीचा (छबीना) पालखी मिरवणूक होईल तर.दि.१८ एप्रिल शनिवारी संध्याकाळी दहिफळ गावात देवीचा (छबिना) पालखी मिरवणूकीने यात्रेची सांगता होणार आहे.या आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमात यात्रेकरु भावीक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन यात्रेची शोभा वाढवावी अशी विनंती वडमाऊली देवस्थानचे अध्यक्ष येडू (नाना) ठोंबरे,सचिव भिकचंद ठोंबरे (सावकार),कोषाध्यक्ष हारीमास्तर ठोंबरे,सदस्य गंगाधर गदळे, रामहारी ठोंबरे,बन्सी ठोंबरे सह इतर सदस्यांसह गावक–यांनी केली आहे.

दहिफळ वडमाऊली यात्रेत येणा–या व जाणा–या प्रवाशांची सोय व्हावी यासाठी वडमाऊली देवस्थानचे अध्यक्ष,सचिव, कोषाध्यक्ष यांनी किल्ले धारुर व बीड आगार प्रमुख यांच्याकडे लेखी पत्र देऊन त्यांना वडमाऊली देवी यात्रा स्पेशल बसेस सोडण्याची मागणी केली आहे.

दहिफळ वडमाऊली यात्रेत येणा–या व जाणा–या भाविक भक्त व महिलांची मोठ्या संख्येने सहभागी होतात.यात्रेत वादतंटा होऊ नये व यात्रा शांततेत पार पडावी म्हणून वडमाऊली देवस्थानचे अध्यक्ष,सचिव, कोषाध्यक्ष यांनी केजचे पोलीस निरिक्षक स्वप्निल उनवणे यांच्याकडे एका लेखी अर्जातून वडमाऊली यात्रेसाठी चोख पीलीस बंदोबस्त व आर.सी.एफ. पथक देण्याची मागणी केली आहे.

## भीमगीतांच्या स्पर्धेतून समतेची हाक

### जयभीम महोत्सवात भीमगीत गायन स्पर्धेला प्रतिसाद



बीड– कष्ट केलेत माझ्या भीमाने, जाती–पातीत वाटू नका रे, लय बळ आलं माझ्या दुबळ्या पोरात, बाबासाहेबांमुळे तुझ्या नी माझ्या घरात... अशा क्रांतिकारी भीमगीतांनी बीड शहर दुमदुमून गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शनिवार (दि.११) रोजी भव्य भीमगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला नागरिकांसह युवक–युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

स्पर्धेची सुरुवात अजय सवाई व त्यांचे सुपुत्र यश सवाई, पियुष सवाई यांनी भीमगीत सादर करून केली. त्यांच्या सादरीकरणातून आंबेडकरी चळवळीचा जाज्वल्य विचार आणि समतेचा संदेश प्रभावीपणे पोहोचला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. वसंत ओगले होते. प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक प्रमोद शिंदे, प्रशांत वासनिक आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. विजेंद्र सरकटे आणि पूनम धूताडमल यांनी काम पाहिले.

या स्पर्धेत सहभागी स्पर्धकांनी बाबासाहेबांच्या कार्यावर आधारित भीमगीते सादर करत सामाजिक समता, बंधुता आणि न्यायाचा संदेश दिला. भीमगीतांच्या माध्यमातून आंबेडकरांच्या विचारांचे प्रबोधन करत समाजात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमात सादर झालेल्या गीतांनी उपस्थितांच्या मनात उत्साह आणि अभिमानाची भावना निर्माण केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अजय सवाई यांनी केले. सूत्रसंचालन आदित्य वीर यांनी केले, तर आभार पीयूष सवाई यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती आणि स्पर्धेच्या आयोजकांनी विशेष परिश्रम घेतले.

हे पत्रक संपादक, मुद्रक, मालक व प्रकाशक अभिजीत नानासाहेब जगताप यांनी योगेश्वरी मुद्रणालय, अंबाजोगाई येथे छापून दैनिक विवेक सिंधु कार्यालय, नगर परिषद व्यापारी संकुल (संकुल क्र.४३,४४) अंबाजोगाई पिन–४३१५१७ जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले आहे. संस्थापक संपादक – प्रा.नानासाहेब गाठाळ ❊ संपादक- अभिजीत जगताप ❊ वृत्तपत्राचा नोंदणी क्र.६५७८८/८५ ❊ फोन–२४७२७०, मो :–९७६४०३३१११,९७६५५०००८८

## जाहिर प्रगटन

दिलीप ईराप्पा लोंढे यांनी जिल्हा तुकडी बीड पोट तुकडी व तालुका पंचायत समिती अंबाजोगाई पैकी अंबाजोगाई नगर परिषद हद्दीतील अमृतेश्वर नगर भागातील जमीन सर्व्हे नं. ८२/२ मधील ज्याचा मिळकत क्र. ३/२३६३ ज्याचे क्षेत्रफळ - पुर्व-पश्चिम- १५.२४ मीटर, दक्षिण-उत्तर - १०.०६ मीटर, एकुण १५३.३४ चौ.मी. आहे. ज्याची चतुःसिमा

**पुर्वेस** - गिरी यांची जागा

**पश्चिमेस** - ०६ मीटरचा रस्ता

**दक्षिणेस** - काटे यांची जागा

**उत्तरेस** - कुलकर्णी यांची जागा

**लोंढे अर्चना रामराव, रा. सावता माळी चौक, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड यांच्याकडुन कायम खरेदी करण्याचा ठराव केला असून सदरील प्लॉट संबंधी कोणाचाही कसलाही हितसंबंध व इतर प्रकारचे हक्क, संबंध असतील तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत आवश्यक त्या मुळ कागदपत्र व पुराव्यासह माझ्याकडे येवून रितसर उजरदारी दाखल करावी. अन्यथा मुदतीनंतर मी सदरीन प्लॉट खरेदीचा व्यवहार पुर्ण करील व त्यानंतर आलेल्या उजरदारीचा विचार होणार नाही. याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.**

**करिता हे प्रगटन प्रसिद्धीस दिले जात आहे.**

**जाहिर प्रगटन देणार**

**स्वाक्षरीत/-**

**दिलीप ईराप्पा लोंढे, रा.परळी वेस, साठे नगर, अंबाजोगाई**

**मो : ९८२२९७२७०३**

## बीडमधील छत्रपती शिवाजी... पान ४ वरून

अधिक अडथळे निर्माण होऊ शकतात, त्यामुळे त्याआधीच रस्त्याचे मुख्य काम पूर्ण होणे आवश्यक आहे. या कामाच्या प्रगतीचा पुन्हा एकदा मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आढावा घेतला जाणार असून, विहित मुदतीत काम पूर्ण न झाल्यास प्रशासनाकडून पुढील पावले उचलली जातील असे संकेतही देण्यात आले आहेत.

## गावठी पिस्टलसह ... पान १ वरून

सदर यशस्वी कामगिरी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार गोविंद भताने, रामचंद्र केकान, मारोती कांबळे, विष्णू सानप यांच्यासह पोलीस अंमलदार सचिन आंधळे, विकी सुरवसे, अतुल हराळे आणि विकास राठोड यांनी सहभाग नोंदवला. आरोपी आणि जप्त केलेले मुद्देमाल बर्दापूर पोलिसांकडे सोपवण्यात आले असून पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## किल्लेधारूरमध्ये क्रांतीसूर्य ... पान ४ वरून

मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून महात्मा फुले यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता अधोरेखित क, प्रा. मेजरशांतीराम बनसोडे, कु. ऋतुजा अशोक नाईकनवरे, कु. वैष्णवी उद्धव खाडे, कु. स्नेहल श्रीकांत कोकाटे, चि. आदित्य नवनाथ फुटाणे, चि. विजय संजय फुटाणे, चि. अनंत राजेश फुटाणे, डॉ. आकेश भारत सत्वधर आदींचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी नितीन शिनगारे, सचिन जाधव, गणेश सावंत, बालाजी चव्हाण, प्रवीण गायके, आनंद भावठाणकर, नगरसेविका मनिषा सोनवणे, संदीप शिनगारे, बालाजी निर्मळ, बाळासाहेब खामकर, बाळासाहेब शिरसाट, पत्रकार सचिन थोरात, ईश्वर खामकर, सुनील कावळे यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंकुश फुटाणे यांनी केले. सूत्रसंचालन दिनेश कापसे यांनी प्रभावीपणे केले, तर दत्तात्रय गोंदणे यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमात महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविण्यात आला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सकल माळी समाजाच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले

## महिलांच्या विविध... पान १ वरून

स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांचे नियोजन अरुणाताई आठवले यांनी सुयोग्य पद्धतीने केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शैलजा ओव्हाळ होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक प्रणिता बोराडे, शिलताई सिरस१ट, मंदा मस्के आदी मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेदरम्यान महिलांनी विविध महापुरुषांच्या प्रतिमा तसेच आकर्षक रेखाटने साकारून आपले कौशल्य दाखविले. महिलांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सहभागी महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभल्याने कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. पल्लवी इलापर्ले आणि डॉ. वंदना फाटले यांनी काम पाहिले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमिला सरवदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. पांडुरंग सुतार यांनी केले, तर आभार प्रिती सिरसाट यांनी मानले.

दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी महिलांच्या स्पर्धांचा हा उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.

## महिलेस मारहाण... पान ४ वरून

म्हणून त्याने मंगल कांबळे हिस काठीने मारहाण केली. तसेच शिवीगाळ करून केसाला धरून खाली पडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

या प्रकरणी मंगल कांबळे यांच्या तक्रारी वरून गणेश विक्रम चाळक याच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु. र. नं. १९२/२०२६ भा. न्या. सं. ११५(२),११८,(१) ३५१(२), ३५२ यासह अॅट्रॉसिटीचे कलम ३(१) (आर), ३(१) (एस), ३(३) (व्ही ए) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याचा तपास सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकटराम हे करीत असून अद्याप आरोपीला अटक करण्यात आलेली नाही.

## कवडगाव (बु.) येथे अखंड... पान ४ वरून

या नाम सप्ताहादरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये काकडा भजन, विष्णू सहस्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन तसेच दुपारच्या सत्रात रामायण ग्रंथ वाचन होणार आहे.

दररोज रात्री ९ ते ११ या वेळेत बीड जिल्ह्यातील नामवंत कीर्तनकार महाराजांची कीर्तनसेवा होणार असून त्यानंतर हरिजागराचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात ह.भ.प. बळीराम महाराज निपटे, ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज शास्त्री, ह.भ.प. श्रीकृष्ण महाराज यादव, ह.भ.प. गणेश महाराज लोंढे, ह.भ.प. शिवानंद महाराज शास्त्री (परतूर) तसेच ह.भ.प. मधुसूदन महाराज गवारे यांची कीर्तनसेवा संपन्न होणार आहे.रविवार दि. २६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत ह.भ.प. शांतिब्रह्म पांडुरंग महाराज मुंडे यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.या पवित्र नाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचा लाभ पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी घ्यावा, असे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळी व भजनी मंडळ, कवडगाव (बु.) यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## बारदाण्याअभावी हरभरा... पान १ वरून

स्वीकारावा लागत आहे.सध्या स्थानिक बाजारात हरभऱ्याला ५२०० ते ५३०० रुपये प्रति क्विंटल दर मिळत असून, शासनाने निश्चित केलेला हमीभाव ५७८० रुपये आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रति क्विंटल सुमारे ४०० ते ५०० रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. मोठ्या थाटामाटात सुरू करण्यात आलेले खरेदी केंद्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांना वेळेवर सेवा देण्यात अपयशी ठरत असल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.दरम्यान, नियोजनातील त्रुटींमुळेच बारदाण्याची कमतरता निर्माण झाली असल्याचा आरोप शेतकरी वर्गातून होत आहे. खरेदी केंद्र वेळेत सुरू राहावे, यासाठी आवश्यक नियोजन न केल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे.या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने बारदाण्याची उपलब्धता करून खरेदी प्रक्रिया सुरळीत सुरू करावी, तसेच शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी शेतकरी वर्गातून होत.

मी नोंदणी करून बरेच दिवस झाले आहेत खरेदी साठी माझा नंबर देखील आला आहे मात्र खरेदी विक्री संघाकडे पोते उपलब्ध नसल्याने खरेदी केंद्र बंद आहे याबाबत तेथे कार्यरत असलेले कर्मचारी यांना संपर्क केला असता फोन घेत नाहीत यामुळे तेथील परिस्थिती लक्षत येत नाही. याबाबत वरिष्ठ अधिकारी यांनी तात्काळ बारदाण्याचा पुरवठा सुरळीत करावा.

**-कुलदीप दरेकर(शेतकरी)**

## मैत्रिणीच्या अश्लिल... पान १ वरून

या प्रकरणाचा उलगडा अतिशय नाट्यमयरीत्या झाला असून मंदार यांनी आत्महत्येपूर्वी त्यांचे भाऊ लौकिक दाभाडे यांना त्यांच्या मोबाईलचा पासवर्ड पाठवला होता. अंत्यविधी आटोपल्यानंतर लौकिक यांनी तो पासवर्ड वापरून मंदार यांचा मोबाईल उघडला असता, त्यामध्ये एक सविस्तर सुसाईड नोट आढळून आली. त्यात मंदार यांनी 'सॉरी पप्पा व भैया' असे म्हणत आपल्या वडिलांची आणि भावाची माफी मागितली असून स्वतःवर ओढवलेल्या प्रसंगाचे वर्णन केले आहे. त्यांच्याच एका सहकाऱ्याच्या घटस्फोटित बहिणीसोबत (मूळ रा. छत्रपती संभाजीनगर, ह.मु. रोहिदास नगर, चनई रोड, अंबाजोगाई ) डॉ. मंदार यांची ओळख होती. तिने मंदार यांना स्वतःचे अश्लील व्हिडिओ आणि चॅट्स पाठवून शरीरसंबंधांसाठी प्रवृत्त केले होते. त्यानंतर तिने 'मी गर्भवती असून माझ्याशी लग्न कर, नाहीतर मी विष पिऊन आत्महत्या करेन आणि सुसाईड नोटमध्ये तुझे नाव लिहीन,' अशी धमकी देत त्याला सातत्याने ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. या सततच्या मानसिक त्रासामुळे आणि बदनामीच्या भीतीने डॉक्टर मंदार दाभाडे खचून गेले होते आणि त्यातूनच त्यांनी टोकाचे पाऊल उचलले.

या धक्कादायक खुलास्यानंतर लौकिक दाभाडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून अंबाजोगाई शहर पोलिसांनी १० एप्रिल रोजी रात्री आरोपी महिले विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) कलम १०८ नुसार आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. या गंभीर प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक ससाणे करत आहेत.

## शालेय बसच्या... पान १ वरून

आर्थिक आघाडीवर देखील सरकारने मोठा बदल सुचवला असून शालेय बसचे भाडे आता प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडून निश्चित केले जाणार आहे. पालकांकडून केवळ मासिक तत्त्वावरच भाडे घेता येईल आणि कोणतीही एकरकमी आगाऊ रक्कम घेण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. या नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्येक शाळेत 'स्कूल ट्रान्सपोर्ट कमिटी' कार्यरत असेल, जी पालकांच्या तक्रारींचे निवारण करेल आणि आपला तिमाही अहवाल सादर करेल.

शालेय बस चालक, वाहक आणि इतर कर्मचाऱ्यांची पोलीस पार्श्वभूमी तपासणी तसेच त्यांचे वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र आणि अधिकृत नियुक्तीपत्र असणे आता आवश्यक असेल. ही नियमावली लागू झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत सर्व वाहनांना या नवीन सुविधांनी सज्ज व्हावे लागेल. विहित मुदतीत त्रुटींची पूर्तता न करणाऱ्या वाहनांचे परवाने निलंबित किंवा रद्द करण्याची कठोर तरतूद या अधिसूचनेत करण्यात आली आहे. या सुधारणांमुळे शालेय वाहतूक अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि तंत्रज्ञानाधारित होईल असा विश्वास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला आहे.

## अंबाजोगाई कृषी... पान ४ वरून

प्रलंबित अर्जांचा तात्काळ निपटारा करण्याच्या सूचना देऊन २० एप्रिल ते ३० मे या कालावधीत प्रत्येक गावामध्ये 'सीआरटी अभियान' अंतर्गत हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक आणि जनजागृती मोहीम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. या मोहिमेच्या अनुषंगाने तंत्रज्ञान समन्वयक शिवप्रसाद येळकर यांनी सविस्तर मार्गदर्शन करत हवामान अनुकूल तंत्रज्ञान राबवताना आवश्यक असणारे तांत्रिक साहित्य, प्रात्यक्षिक प्रशिक्षण देताना लक्षात घ्यावयाच्या बाबी आणि खरीप पूर्व नियोजनावर भर दिला. यामध्ये प्रामुख्याने बीबीएफ तंत्रज्ञान प्रात्यक्षिक देण्यासाठी यंत्र उपलब्धता, टोकन पद्धतीने पिकांची लागवड करण्यासाठी सरी वरंबे तयार करणे, बीजप्रक्रिया, बियाणे उगवणक्षमता तपासणी, शून्य मशागत आणि 'दहा ड्रम थेअरी'द्वारे सेंद्रिय निविष्ठा व दशपर्णी अर्क तयार करण्याच्या पद्धतीवर येळकर यांनी विशेष प्रकाश टाकून महाविस्तार एआय पवर कीड-रोगांचे निरीक्षण नोंदवण्याबाबत सूचना देऊन समूह सहाय्यकांना जमीन सुपीकता आणि पीक संरक्षणाशी संबंधित माहितीपुस्तिकांचे वाटप केले. लेखा अधिकारी रवी मुंडे यांनी डीबीटी एप्लीकेशनमधील तांत्रिक अडचणींबाबत मार्गदर्शन केले. बैठकीत या बैठकीस प्रकल्प सहाय्यक बालाजी तोकले, समूह सहाय्यक अनुराधा पाचपिंडे, सरस्वती चाटे, अनुराधा मुंडे, हनुमंत चोले, भूषण कांबळे, निवृत्ती कोल्हे, शुभम जोशी, मयूर निकम, सुशांत धावरे, वैभव भोले, वंदना वाव्हळ, शिवराम तांदळे, विवेकानंद आदमाने, वैभव मुंडे उपस्थित होते.

## भीमजयंती निमित्त... पान ४ वरून

या कार्यक्रमाच्या सुरुवातीस तथागत बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्प तथा पुष्पहार अर्पण करण्यात आले. नंतर तिसरण व पंचशील ग्रहण करण्यात आले.

यावेळी बोलताना ड शाम तांगडेत म्हणाले की , संविधान अमलात आल्यानंतर स्वातंत्र्य , समता , बंधुता या मूल्यांवर राष्ट्र निर्माण करण्याचे निश्चित करण्यात आले. हाच राष्ट्रवाद स्विकारण्यात आला. आत्ताच संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला पण भारतीय राष्ट्रवादाची कुठे चर्चा झाली नाही. विविध सत्ताबाह्य केंद्र देशात अराजकतेला आणि धार्मिक कट्टरतेला खतपाणी घालत आहेत. सत्ताधारी व विरोधक संविधान मूल्य रुजविण्याकडे दुर्लक्ष करीत आहेत. सत्तेत बसून ते द्वेष पसरवीत आहेत. मतांची लूटपाट करून , पैसे देऊन , अवैध मार्गाने सत्तेत जात आहेत. सत्ताधारी व विरोधक दोघेही मिळून भारतीय नागरिकांना असुरक्षित करीत आहेत. लोकशाहीमध्ये सरकारविषयी आदर असला पाहिजे पण लोकांना तर सरकारच्या निर्णयांची भीती वाटत आहे. कल्याणकारी निर्णय घेण्याऐवजी दहशत निर्माण करणारे कायदे केले जात आहेत. ते संविधानाच्या अंमलबजावणीची शपथ घेऊन संविधान विरोधी काम करीत आहेत. स्वातंत्र्यानंतर देशात बाबासाहेबांच्या चळवळीचा प्रभाव होता. बाबासाहेबांचे नेतृत्व मान्यता प्राप्त झाले होते. म्हणून सत्ता जाण्याच्या भीतीने मवाळवादी ब्राह्मणवादाने सत्ता ताब्यात घेतली व आक्रमक आंबेडकरवादी काँग्रेसमध्ये विलीन करून घेतले. २०१४ मध्ये त्यांनीच कट्टर ब्राह्मणवाद्यांच्या ताब्यात सत्ता दिली. अशा परिस्थितीत आंबेडकरवादी संविधानाचा जागर करीत आहेत. प्रत्येक ठिकाणी विचारविनिमयाची केंद्रे चालू केली पाहिजेत. आपल्याकडे व्यवस्था आहे फक्त यंत्रणा उभी करण्याची गरज आहे. जयंती भावनिक पातळीवर न राहता आता विचाराची प्रक्रिया गतीमान करत आहे. प्रबोधन व जागृतीसाठी मोठ्या प्रमाणावर प्रचाराची गरज आहे. राष्ट्रातील अराजकतेवर समर्थ उपाय हा आंबेडकरवादच आहे असे ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात गुलाबराव गायकवाड म्हणाले की , देशात अराजक सदृष्य परिस्थिती उद्भवली आहे. त्यासाठी संविधानाचा प्रचार प्रसार करणे गरजेचे आहे. असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गणेश सुर्यवंशी यांनी केले. प्रास्ताविक डॉ. किर्तीराज लोणारे यांनी केले तर आभार प्रदर्शन संजय हतागळे यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप सरणत्तय गाथेने करण्यात आला. या कार्यक्रमास खंडेराव जाधव गुरुजी , विश्वनाथ सावंत , भारत सातपुते , पांडुरंग लांडगे , ड. दिलीप गोरे , प्रबतराव पाळवदे , वसंत वाघमारे , मिलिंद कांबळे , वामन वाघचौरे , मंगेश भोले , सुभाष घाडगे , नरसिंग तरकसे आदींची उपस्थिती होती.

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

सर्वत्रास विशेषतः **पोखरी व अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड** येथील लोकांस या नोटीस खाली सही करणारे आमचे खरेदीदार अशील यांनी माहीती दिलेवरुन आणि सर्वत्रास जाहीर नोटीस देणेस सांगितले वरून या नोटिसने कळविण्यात येते की, **पोखरी ता. अंबाजोगाई जि. बीड** येथील जमीन गट नं.-३३२ मधील क्षेत्रफळ ०० हेक्टर ४८ आर असून याची चतुः सीमा पूर्व-जमीन गट नं.-३३१ मधील सय्यद मतीन यांची जमीन, पश्चिमेस- सेलु अंबा पोखरी शिव रस्ता, दक्षिण - लातुर ते केज मार्गे बीड जाणारा राज्य रस्ता, उत्तर- जमीन गट नं.-३३३ मधील जमीन, यांची जमीन अशा वर्णनाची जमीन सर्व वहीवाट हक्कासह.

नोटीस विषय जमीनीचे वरील प्रमाणे क्षेत्राचे **मालक अकबर गफुर बागवान** यांनी त्यांचे स्वंतत्र मालकी व कब्जाबद्दल हमी देऊन, त्या संदर्भाने महसुल नोंद दाखवुन आणि कायदेशीर व नैतिक गरजेपोटी नोटीस विषय मिळकती पैकी ०.१० गुंठे विक्री बद्दल आमचे अशील **सय्यद मतीन दस्तगीर रा. आडस ता. केज जि. बीड** यांचेशी बोलणी करुन विसार रक्कम दिलेली आहे. सदर मिळकतीवर कोणाचाही बोजा किंवा इतर कसलेही प्रकारचे हक्क हितसंबंध व कोणाशीही कसलाही करारसंबंध राहीलेला नसलेचा भरवसा आमचे अशील यांना दिला आहे. सदर मिळकत खरेदी घेण्यास आमचे अशील तयार असुन त्यांची चर्तुः सोमा पूर्व जमीन गट नं.३३१ मधील सय्यद मतीन यांची जमीन, पश्चिमेस- यांच जमीन गट नं.-३३२ मधील उर्वरित जमीन, दक्षिण-लातूर ते केज मार्गे बीड जाणारा राज्य रस्ता, उत्तर- जमीन गट नं.३३३ मधील जमीन आहेत.

तरी सर्वत्रास या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, सदर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १० दिवसाचे आत नोटीस विषय मिळकत ०.१० गुंठे विक्री व्यवहारास ज्यांची कोणाची कोणतेही कारणाने हरकत असेल किंवा कोणाचेही सदर मिळकती संदर्भाने ज्यांचे कोणाचे वारस हक्क, पोटगी, कर्ज बोजा, वहिवाट, अतिक्रमण असेल किंवा अशा प्रकारचे हक्क असतील त्यांनी आमचे ऑफीस वेळेत कागद पत्रांसह भेट घेऊन त्यांचे हक्कांची खात्री करून द्यावी, नसता सदर मिळकत निजोखीम व निर्वेध समजुन आणि ज्यांचे कोणाचे जे काही हक्क असतील ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले असे ग्राहय धरून विक्री व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत चालणार नाही.

कळावे ही जाहीर नोटीस दिली.

| मार्फत | नोटीस देणार |
| --- | --- |
| **स्वाक्षरीत/-**<br>**ॲड.संतोष देविदासराव कन्नडकर**<br>रेणुका निवास, योगेश्वरी प्राथमिक शाळे मागे, अंबाजोगाई, मो.९३०९१५२४१८ | **स्वाक्षरीत/-**<br>**अशील - सय्यद मतीन दस्तगीर,रा.आडस ता.केज जि.बीड**<br>**मो.९४२००३७६८७** |

## महात्मा गांधी यांनी... पान १ वरून

शनिवार, दिनांक ११ एप्रिल रोजी जयंती दिनाचे औचित्य साधून श्री योगेश्वरी शिक्षण संस्था कार्यालय परिसरातील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार व पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी बोलताना लोकविकास महाआघाडीचे प्रमुख नेते राजकिशोर मोदी म्हणाले की, महात्मा फुले यांनी तत्कालीन काळात प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. त्यांचे विचार आणि कार्य आजही आपल्याला समताधिष्ठित समाज घडविण्यासाठी प्रेरणादायी आहेत. समाजात समता, बंधुता आणि शिक्षणाचा प्रकाश पसरविणारे थोर क्रांतीकारक महात्मा ज्योतिबा फुले यांची आज जयंती. या निमित्ताने समतेचे प्रणेते महात्मा ज्योतिबा फुले यांना जयंतीदिनी कोटी-कोटी प्रणाम, अभिवादन करून उपस्थित आपण सर्वांनी महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करूयात असे ही आवाहन मोदी यांनी केले. त्याला उपस्थित सर्वांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

तर यावेळी माजी आमदार पृथ्वीराज साठे म्हणाले की, थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांची आज जयंती. या निमित्ताने संपूर्ण केज विधानसभा मतदारसंघात व अंबाजोगाई शहर आणि तालुक्यात विविध ठिकाणी सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. महात्मा फुलेंनी तत्कालीन रूढी-परंपरांना छेद देत सामान्य माणसाला स्वाभिमानाने जगण्याची नवी वाट दाखवली. त्यांच्या जयंतीनिमित्त आज येथे आपण त्यांच्या विचारांचे स्मरण करूयात. विद्येविना मती गेली हा संदेश देणाऱ्या या महान विभूतीला आज सर्वस्तरांतून मानाचा मुजरा करण्यात येत आहे. असे माजी आमदार साठे यांनी सांगितले.

याप्रसंगी राजकिशोर मोदी (नेते - लोकविकास महाआघाडी.), पृथ्वीराज साठे (माजी आमदार, केज विधानसभा, मतदार संघ.), दिनेश भराडीया (उपनगराध्यक्ष - नगरपरिषद, अंबाजोगाई.), सय्यद ताहेरभाई (गटनेता - नगरपरिषद, अंबाजोगाई.), नगरसेवक महेश कदम, महेश लोमटे, ॲड.विकास काकडे, मालू जोगदंड, आकाश कराड, राजपाल जावळे, नजीर उमरदराजखान पठाण, भिमसेन लोमटे, अकबरखाँ पठाण, दत्तात्रय सरवदे, सचिन जाधव, माजी नगरसेवक गणेश मसने, सुनील वाघाळकर, तानबा लांडगे, गोविंद पोतंगले, विशाल पोटभरे यांच्यासह अनेक मान्यवर, नागरिक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिलांच्या विविध स्पर्धांना प्रतिसाद

बीड – बीड शहरात दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी दि.५ ते १४ या कालावधीत जयभीम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने महिलांच्या विविध स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या, या स्पर्धेत सर्वच वयोगटातील स्पर्धक मोठ्या संख्येने हभागी झाले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शुक्रवारी (दि.१०) रोजी महिलांसाठी विविध

पान ३ वर


दैनिक
# विवेक सिंधु

रविवार, दि.१२ एप्रिल २०२६ पान ४


## कवडगाव (बु.) येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे भव्य आयोजन

कवडगाव – वडवणी तालुक्यातील कवडगाव (बु.) येथे भव्य-दिव्य अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा दि. १९ एप्रिल २०२६ रोजी (वैशाख शुद्ध द्वादशी) पासून प्रारंभ होणार असून सात दिवस चालणार आहे.

पान ३ वर

## महिलेस मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ

### ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल; आरोपी फरार

केज – शेतात ज्वारीची कापणी करण्यासाठी जात असलेल्या महिलेला सार्वजनिक ठिकाणी काठीने व लाथा बुक्क्यांनी मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ केल्याची घटना केज तालुक्यात घडली असून एका विरुद्ध ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला आहे. मात्र अद्याप पर्यंत आरोपी आरोपीला अटक करण्यात आलेली नाही.

दि. ८ रोजी मंगल प्रदीप कांबळे ही महिला दुपारी २:३० च्या सुमारास अभिमान काशीनाथ चाळक यांचे शेतात ज्वारी खुडण्यासाठी जात असतांना गणेश विक्रम चाळक याने तिला मस्साजी जाधव यांच्या घरा समोर सार्वजनीक रस्त्यावर जातीवाचक शिवीगाळ केली. त्याला शिव्या देण्याचे कारण विचारताच तो म्हणाला की, त्याने मंगलचा नवरा प्रदीप कांबळे याला त्याने ४ हजार ५०० रु दिले आहेत. मी पैसे त्याला दिले आहेत तू मला विचारणारी कोण ? असे

पान ३ वर

## बारदाण्याअभावी हरभरा खरेदी केंद्र आठ दिवसांपासून बंद; शेतकरी अडचणीत

किल्लेधारूर – नाफेड अंतर्गत धारूर शहरातील खरेदी-विक्री संघाच्या वतीने स्थानिक बाजार समितीत सुरु असलेले शासकीय हरभरा खरेदी केंद्र मागील आठ दिवसांपासून बंद असल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. बारदाण्याचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे खरेदी प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाली आहे. परिणामी नोंदणी केलेले शेकडो शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत.




तालुक्यात यंदा सुमारे १५ हजार हेक्टर क्षेत्रावर हरभऱ्याची पेरणी करण्यात आली होती. परतीच्या पावसामुळे उत्पादनही समाधानकारक झाले आहे. त्यामुळे शेतकरी मोठ्या अपेक्षेने आपला माल शासकीय खरेदी केंद्रावर विक्रीसाठी आणत आहेत. मात्र बारदाण्या अभावी खरेदी केंद्र बंद असल्याने शेतकऱ्यांना नाईलाजाने स्थानिक बाजाराचा पर्याय

पान ३ वर

## चालत्या ट्रकमधून हरभऱ्याचे दोन कट्टे लंपास

केज – कळंमअंबा (ता. केज) येथील ट्रक चालक जानुमिया शेख हे ९ एप्रिल रोजी रात्री १०.३० वाजेच्या सुमारास नांदूरघाट येथील हरभरा हमीभाव खरेदी केंद्रातून हरभऱ्याचे कट्टे ट्रकमध्ये (एम. एच. ४४ – ९६२७) भरून बनसारोळा येथील गोडाऊन ठेवण्यासाठी घेऊन चालले होते. अज्ञात चोरट्यांनी ट्रकवर चढून ट्रकमधील दहा कट्टे खाली फेकून दिले. केवडजवळ आल्यावर ट्रकवर कोणी तरी चढल्याचे जाणवले. म्हणून त्यांनी ट्रक थांबवून बघितल्यास ताडपत्री फाटल्याचे दिसले. त्यांनी ही माहिती दिल्यानंतर भिमराव जाधव हे आपल्या मित्रांसह त्यांच्याकडे येत असताना त्यांना वाटेत कापरेवाडी पुलाजवळ रस्त्याच्या कडेला आठ कट्टे मिळून आले. तर तोपर्यंत चोरट्यांनी ५ हजार ८७५ रुपये किंमतीचे हरभऱ्याचे दोन कट्टे लंपास केले. त्यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला असून तपास सहाय्यक फौजदार बाबासाहेब बांगर हे करीत आहेत.

## बीड जिल्ह्यात चोरीचे सत्र सुरूच

### लाखांच्या टेम्पोसह शेतीमाल आणि दुचाकी लंपास

बीड: शहरासह ग्रामीण भागात चोरट्यांनी उच्छाद मांडला असून आठ व नऊ एप्रिल रोजी पेठ बीड, नांदूरघाट आणि सायगाव परिसरातून टेम्पो, दुचाकी आणि शेतीमालाची चोरी झाल्याचे समोर आले आहे. या घटनांमुळे व्यापारी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पेठ बीड परिसरातील हॉटेल चंद्रलोक समोरून अशफाक मोमीन यांचा अशोक लेलँड टेम्पो आणि त्यातील सतरा हजारांचा मसाला असा एकूण एक लाख सत्याऐंशी हजार रुपयांचा माल अज्ञात चोरट्यांनी पळवला. दुसरीकडे, नांदूरघाट ते यु वडगाव प्रवासादरम्यान चालत्या ट्रकमधून अज्ञात चोरट्याने पाच हजार आठशे पंच्याहत्तर रुपये किमतीची हरभऱ्याची दोन पोते लंपास केली. तसेच, सायगाव येथील भारज पाटी येथून परमेश्वर मस्के यांची वीस हजार रुपयांची दुचाकी चोरीला गेली आहे. या सर्व प्रकरणांत दहा एप्रिल रोजी संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## जाब विचारणाऱ्या व्यक्तीला चाकूने भोसकले आणि चावा घेतला

बीड: पेठ बीड परिसरात एका अठरा वर्षीय तरुणाने दारूच्या नशेत हिंसक कृत्य करत एका व्यक्तीच्या छातीवर चाकूने वार केल्याची घटना सात मार्च रोजी घडली. पित्याला शिवीगाळ का केली, याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या फिर्यादीच्या मानेला आणि हाताला या आरोपीने दाताने चावा घेऊन गंभीर जखमी केले आहे.

या प्रकरणी पेठ बीड पोलिसांनी दहा एप्रिल रोजी महेश आदिनाथ फसले या आरोपीवर बाललैंगिक अत्याचार



प्रतिबंधक अधिनियम आणि भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. हॉटेल मनजाई समोर दारू पीत बसलेल्या आरोपीला फिर्यादीने वडिलांना शिवीगाळ करण्याचे कारण विचारले. यावर संतप्त झालेल्या आरोपीने त्यांना चापटाबुक्क्यांनी मारहाण केली आणि चाकूने छातीवर वार केले. याशिवाय आरोपीने जिवे मारण्याची धमकी देत हिंसक पद्धतीने चावा घेतला.

## किल्लेधारूरमध्ये क्रांतीसूर्य फुले जयंती उत्साहात

### समतेचा जागर करत गुणवंतांचा शाही सन्मान

किल्ले धारूर – क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त किल्ले धारूर येथे समता, शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणारा भव्य कार्यक्रम उत्साहात पार पडला. येथील हुतात्मा स्मारक परिसरात आयोजित या सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंत मान्यवरांचा दिमाखदार सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

किल्ले धारूर येथे सकल माळी समाजाच्या वतीने महात्मा




ज्योतिबा फुले यांची १९९ वी जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष बालासाहेब जाधव होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव करत समाजाने शिक्षण व समतेच्या विचारांचा स्वीकार करून प्रगतीचा मार्ग अवलंबावा, असे आवाहन केले.

प्रमुख पाहुणे म्हणून उपनगराध्यक्ष सय्यद शाकेर, ज्येष्ठ पत्रकार अनिल महाजन, सूर्यकांत जगताप, विनायक शिनगारे यांच्यासह

पान ३ वर

## बीडमधील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाका रस्त्याचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करा; जिल्हाधिकाऱ्यांचे कडक निर्देश

बीड – बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाका या दोन किलोमीटर अंतराच्या मुख्य रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने सुरु असल्यामुळे निर्माण झालेली गैरसोय दूर करण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी हे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे कठोर निर्देश दिले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या विशेष बैठकीत त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित कंत्राटदार कंपनीच्या अधिकाऱ्यांना कामाचा वेग वाढवण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करण्याच्या सूचना दिल्या. या




रस्त्यावर अनेक ठिकाणी खोदकाम करून ठेवल्यामुळे शहरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून वाहनधारकांसह पादचाऱ्यांनाही मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

प्रशासकीय पातळीवर झालेल्या या बैठकीत निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्यासह बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि कंत्राटदार कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की पावसाळा सुरु झाल्यानंतर कामात

पान ३ वर

## अंबाजोगाई कृषी उपविभागात २० एप्रिलपासून राबवणार 'सीआरटी' प्रात्यक्षिक मोहीम

### समूह सहायकांना हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचे धडे; पीक संरक्षण व सुपीकता पुस्तिकेचे वितरण

अंबाजोगाई (प्रतिनिधी)– अंबाजोगाई उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालयांतर्गत येणाऱ्या केज, परळी व अंबाजोगाई तालुक्यातील १७० गावांमध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाची (एनडीकेएसपी) आढावा बैठक उपविभागीय कृषी अधिकारी राहुल गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत डी.बी.टी. पोर्टलवरील



पान ३ वर

## भीमजयंती निमित्त राष्ट्रातील अराजकतेवर समर्थ उपाय आंबेडकरवाद यावर व्याख्यान संपन्न




अंबाजोगाई – संघर्षभूमी येथील १४ दिवशीय उपक्रमातील दहाव्या दिवशी व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात ' राष्ट्रातील अराजकतेवर समर्थ उपाय : आंबेडकरवाद ' या विषयावर ड शाम तांगडे यांचे व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुलाबराव गायकवाड हे होते.

पान ३ वर